जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२
२६८१ खालील निधी वितरीत करणेबाबत..
जिल्हा-पालघर

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जशिअ- २०१७/प्र.क्र.१९८/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४
२. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ २०१६/प्र.क्र. २६६/ जल-७, दि. ३० डिसेंबर, २०१६
३. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१६/प्र.क्र.५१८/जल-७, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक १४ मार्च, २०१७
४. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र.१९८/जल-७, दिनांक २७ एप्रिल, २०१७ व २२ मे २०१७, दिनांक ७ जून २०१७, दिनांक ७ जुलै, २०१७, दिनांक १२ जुलै, २०१७ व दिनांक ६ नोव्हेंबर २०१७ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १५ मार्च २०१८

प्रस्तावना: -

जलयुक्त शिवार योजनेसाठी लेखाशिर्ष ४४०२ २६८१ खाली सन २०१७-१८ करिता रु.१२००.०० कोटी एवढी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. सदर तरतुदीपैकी सन २०१६-१७ च्या गावांकरिता संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल २०१७ अन्वये रु.२००.०० कोटी निधी व दिनांक २२ मे, २०१७ अन्वये ₹ ५००.०० कोटी आणि सन २०१७-१८ च्या गावाकरिता दिनांक ७ जून, २०१७ अन्वये ₹ ४७५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. जलयुक्त जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्रशिक्षणासाठी दिनांक ७ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये ₹ ४.५० लक्ष व दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये ₹ ४६६.२९ लक्ष निधी वितरीत केलेला आहे. तसेच दिनांक १२ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये ₹ ३००.०० लक्ष निधी मंत्रालय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता वितरीत केलेला आहे.

सन २०१७-१८ च्या गावाकरिता दिनांक ७ जून, २०१७ अन्वये ₹ ४७५.०० कोटी निधी वितरणाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला होता. तथापि वित्त विभाग़ाने ८० टक्के निधी उपलब्ध करून दिल्याने त्यापैकी ₹ २५०.०० कोटी निधी बिम्स प्रणालीवर संबधित जिल्हयास उपलब्ध करुन दिल्याने त्यानुसार निधी वितरणाबाबतचे शासन शुध्दीपत्रक दिनांक १५ मार्च २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे.

जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्ष ४४०२ २६८१ मध्ये वित्त विभागाने १०० टक्के निधी उपलब्ध करून दिलेला असून मागणीच्या अनुषंगाने निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>**:-

वित्त विभागाने लेखाशिर्ष ४४०२ २६८१ मध्ये १०० टक्के निधी वितरणासाठी उपलब्ध करून दिला असल्याने जलयुक्त शिवार अभियानकरीता **रु. ०.९३ कोटी** व गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार करिता **रु. ०.५७ कोटी** असा एकूण **रु. १.५० कोटी** (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लक्ष) तरतुद वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात येत असून विभागिय आयुक्त यांना नियंत्रक अधिकारी व जिल्हाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. वितरीत करण्यात येत असलेल्या तरतुदी खर्च करताना खालील अटीं व शर्तीचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२.१ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर अखर्चित राहणारा निधी बीम्स प्रणालीवरुन बँक खात्यात काढून ठेवता येणार नाही.

२.२ या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येत असलेला निधी अनुक्रमे सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये निवडलेल्या गावातील पूर्ण झालेल्या कामांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीमधून झालेल्या खर्चाचे गाव निहाय व वर्षनिहाय विवरणपत्र शासनास सादर करावे.

२.३ गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदीपैकी अखर्चित राहणारी तरतुद जलयुक्त शिवार अभियानांतर्गत परिच्छेद २.२ नुसार उपलब्ध करुन देता येईल.

२.४ या शासन निर्णयाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदीमधून झालेल्या खर्चाचा हिशोब स्वतंत्ररित्या ठेवावेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदीमधील खर्चाचा ताळमेळ विहीत कालावधीत पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

२.५ उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जलयुक्त शिवार अभियान यांची राहील.

३. सदर निधी मागणी क्रमांक एल ७, ४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च, ०० १०२ मृद संधारण, ०३ जलयुक्त शिवार अभियान, (०३ ) (०१) जलयुक्त शिवार अभियान (४४०२ २६८१ ), ५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ९१/२०१८/को.प्र.५ दि.०६/०३/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०३१६१३०१४२११२६** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2018.03.16 13:03:13 +05'30'

**( सु.द.नाईक )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव
३. मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद व विधानसभा, विधान भवन, मुंबई
९. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई
१०.मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
११.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१४. आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद
१५.विभागीय आयुक्त, ठाणे
१६.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
१७.मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९.अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे
२०.विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे

२१.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२३.सहसंचालक, सामाजिक वनीकरण, पालघर
२४. उप वनसंरक्षक, पालघर
२५.संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर
२६.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
२७. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर
२८. कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण)/जिल्हापरिषद, पालघर
२९.जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
३०.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
३१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
३२.सर्व मंत्रालयीन विभाग
३३.सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव,मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय
३४.कार्यासन जल-११ व कार्यासन जल-१९ जलसंधारण विभाग, मंत्रालय.
३५. निवडनस्ती जल-७.